# राज्य सहकारी बँकेतर्फे पर्येत कार्यक्रम




**पर्ये** : ग्रामपंचायत सभागृहात आयोजित गोवा राज्य सरकारी बँकेच्या कार्यक्रमास उपस्थित मान्यवर.

**पणजी, ता. २२ (प्रतिनिधी):** गोवा राज्य सहकारी बँक यांच्या पर्ये शाखेतर्फे १९ ऑगस्ट रोजी पर्ये ग्रामपंचायत सभागृहात आर्थिक समावेशन संपृक्तता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा आणि महाराष्ट्र यांच्या रिझर्व्ह बँकेचे मुख्य सरव्यवस्थापक संजीव कुमार उपस्थित होते. तसेच अन्य निमंत्रित मान्यवरांमध्ये आरबीआय, गोवा क्षेत्राचे संचालक प्रभाकर झा, डीजीएम आरबीआय सँड्रा रॉड्रिग्ज, डीजीएम नाबार्ड गोवा क्षेत्रचे विश्वास कदम, पर्येच्या सरपंच दीपा नाईक व गोवा राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक अनंत चोडणकर यांचा समावेश होता.

प्रारंभी अनंत चोडणकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि या मोहीमेच्या आयोजनाविषयी माहिती दिली. सुनिल मडकईकर यांनी पीएमजेडीवाय, पीएमजेजेबीवाय, पीएमएसबीवाय आणि अटल पेंशन योजना यासारख्या विविध योजनांविषयी सादरीकरण केले. प्रत्येक योजनेबाबत पात्रता निकष आणि त्यांचे लाभ यांची त्यांनी सविस्तर माहिती दिली. बँकेतील फेर-केवायसीचे महत्व त्यांनी सांगितले.

कायदा अधिकारी श्रुती लोलयेकर यांनी तक्रार निवारण विषयावर भाष्य केले. विश्वास कदम यांनी नाबार्डच्या विविध योजनांविषयी विवेचन केले. तसेच अशा प्रकारच्या मोहिमांचे महत्व विषद केले. नाबार्डच्या योजनांचा लोकांनी पूर्ण लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. प्रभाकर झा यांनी विविध योजनांची माहिती दिली.